श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe

इयत्ता – सहावी (7 जुलै) माझा अभ्यास

Subscribe

शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

दिवस सातवा : ☞ CLICK HERE

ब्रीज कोर्ससोबत चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट. (वापरणे सक्ती नाही)

- पाठ वाचा व स्वाध्याय सोडवा. **सायकल म्हणते, मी आहे ना!**

टेस्ट सोडवा

स्वाध्याय

प्र. १. चार–पाच वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) मुले सायकलचा वापर कशाकशासाठी करतात?

(आ) सायकल चालवणाऱ्याला वेगळा व्यायाम करण्याची गरज पडणार नाही असे का म्हटले आहे?

(इ) सायकलच्या रूपात कसा कसा बदल होत गेला?

प्र. २. तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.

(अ) आठवड्यातून एक दिवस स्वतःचे वाहन न वापरता, सार्वजनिक वाहनानेच प्रवास करायचा असे सर्वांनी ठरवले, तर कोणकोणते फायदे होतील?

(आ) तुमच्या कुटुंबातील, परिसरातील व्यक्तींनी सायकलचा वापर करावा यासाठी तुम्ही कोणकोणते प्रयत्न कराल ?

प्र. ३. खालील आकृतीत दिलेल्या मुद्द्यांप्रमाणे सायकल चालवण्याचे फायदे लिहा.

प्र. ४. सायकलचे निरीक्षण करा व तिच्या भागांची नावे लिहा.

प्र. ५. सायकल शिकताना तुम्हांला आलेले अनुभव आठ ते दहा वाक्यांत लिहा.

प्र. ६. संगणक तुमच्याशी बोलू लागला तर.... कल्पना करा व लिहा.

प्र. ७. सायकल व मोटारसायकल यांचा संवाद आठ ते दहा ओळींत लिहा.

खेळूया शब्दांशी.

(अ) खालील शब्दांचे अर्थ समजून घ्या.

(अ) प्रचार व प्रसार (आ) विश्वास व आत्मविश्वास

(आ) खालील वाक्प्रचारांचा वाक्यांत उपयोग करा.

(अ) रखडत चालणे (आ) धडा शिकणे (इ) हातभार लावणे

(इ) हलकीफुलकी म्हणजे खूप हलकी, तसे खालील शब्दांचे अर्थ लिहा.

(अ) कधीमधी (इ) धामधूम (उ) साधेसुधे

(आ) अवतीभवती (ई) फेरफटका

(ई) 'आडरस्ता' यासारखे आणखी शब्द लिहा.

उपक्रम : तुमच्या गावातील सायकल दुरुस्ती करणाऱ्या व्यक्तीची भेट घ्या. सायकल दुरुस्तीच्या विविध कामांबाबत त्या व्यक्तीकडून माहिती मिळवा.

वाचा व सोडवा.

टेस्ट सोडवा

3. जोड्या लावा.

A गट		B गट
(i)		(a) किरण
(ii)		(b) प्रतल
(iii)		(c) रेषा
(iv)		(d) रेषाखंड

4. खालील आकृतीचे निरीक्षण करा. त्यातील समांतर रेषा, एकसंपाती रेषा व संपात बिंदू यांची नावे लिहा.



ICT Tools or Links

Geogebra सॉफ्टवेअरच्या tools चा वापर करून वेगवेगळे बिंदू, रेषा, किरण काढा. कधीही न संपणाऱ्या रेषेचा अनुभव घ्या.

थोडी गंमत !

एक सपाट थर्मोकोलचा किंवा पुठ्ठ्याचा तुकडा व सुई दोरा घ्या. दोऱ्याच्या एका टोकाला मोठी गाठ मारा किंवा एखादे बटण बांधा. दुसरे टोक सुईत ओवून सुई पुठ्ठ्याच्या खालून टोचून वर काढा. जेथून दोरा वर आला आहे त्या बिंदूला P नाव द्या. आता सुई काढून ठेवा व दोऱ्याचे सुटे टोक ताणून धरा. कोणती आकृती दिसते? दोऱ्याचे सुटे टोक सावकाश वेगवेगळ्या दिशांना वळवून ताणून धरा. P बिंदूतून असंख्य रेषा जातात हे अनुभवा.



टेस्ट सोडवा

Read and solve.

3. Match the following :

	Group A	Group B
(i)		(a) Ray
(ii)		(b) Plane
(iii)		(c) Line
(iv)		(d) Line segment

4. Observe the figure below. Name the parallel lines, the concurrent lines and the points of concurrence in the figure.



ICT Tools or Links

Use the tools of the Geogebra software to draw various points, lines and rays. See for yourself what a never ending line is like.

Maths is fun !

Take a flat piece of thermocol or cardboard, a needle and thread. Tie a big knot or button or bead at one end of the thread. Thread the needle with the other end. Pass the needle up through any convenient point P. Pull the thread up, leaving the knot or the button below. Remove the needle and put it aside. Now hold the free end of the thread and gently pull it straight. Which figure do you see? Now, holding the thread straight, turn it in different directions. See how a countless number of lines can pass through a single point P.



टेस्ट सोडवा

Read and understand. Revision

4. **Any number of things !** : Form pairs or groups. One person says any number from one to ten thousand. Others name suitable objects or things for the number.

5. **One word to fit them all :** Choose at least 3 words from the box and think of something that fits them all. Write down the meaningful phrase you have made.

tall	short	**little**	small	big	young	old
strong	long	thick	thin	fat	cold	hot
bright	nice	clean	clever	dirty	**soft**	hard
black	white	red	green	blue	golden	pink
yellow	**violet**	dark	new	raw	shiny	sweet
juicy	ripe	round	tasty	bad	pretty	ugly
		crunchy		beautiful		

पाठ वाचा व स्वाध्याय सोडवा.

१. भारतीय उपखंड आणि इतिहास

टेस्ट सोडवा



म्हणजे 'तांबड्या समुद्राचे माहितीपुस्तक'. या पुस्तकात भारतीय बेटांचा उल्लेख आहे. हे पुस्तक एका अनामिक ग्रीक खलाश्याने लिहिलेले आहे.

करून पहा.

भारताच्या नकाशा आराखड्यात खालील ठिकाणांची नोंद करा.

१. हिमालय पर्वत
२. थरचे वाळवंट
३. पूर्व किनारपट्टी

अंदमान बेट

१.३ भारतीय उपखंड

हडप्पा आणि मोहेंजोदडो ही शहरे आजच्या

पाकिस्तानात आहेत. अफगाणिस्तान, पाकिस्तान, नेपाळ, भूटान, बांग्लादेश, श्रीलंका आणि आपला भारत देश मिळून तयार होणारा भूभाग 'दक्षिण आशिया' या नावाने ओळखला जातो. याच भूभागातील भारत देशाचा विस्तार आणि महत्त्व लक्षात घेऊन या प्रदेशाला 'भारतीय उपखंड' असेही म्हणतात. हडप्पा संस्कृतीचा विस्तार प्रामुख्याने भारतीय उपखंडाच्या वायव्य भागात झालेला होता.

चीन आणि म्यानमार हे आपले शेजारी देश दक्षिण आशियाचा किंवा भारतीय उपखंडाचा हिस्सा नाहीत. तरीही प्राचीन भारताशी त्यांचे ऐतिहासिक संबंध आले होते. प्राचीन भारताच्या इतिहासाच्या अभ्यासात त्यांचे महत्त्वाचे स्थान आहे.

स्वाध्याय

१. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(१) इतिहास म्हणजे काय?

(२) मानवी समाज दीर्घकाळ वस्ती कोठे करतो?

(३) डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या लोकांना अन्नासाठी प्रामुख्याने कशावर अवलंबून रहावे लागते?

(४) भारतातील सर्वाधिक प्राचीन नागरी संस्कृती कोणती?

२. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

(१) मानवी समाजजीवन कोणत्या गोष्टींवर अवलंबून असते?

(२) आपण राहतो त्या प्रदेशातील कोणत्या गोष्टी आपल्या जगण्याची साधने असतात?

(३) 'भारतीय उपखंड' असे कोणत्या प्रदेशाला म्हणतात?

३. कारणे लिहा.

(१) इतिहास आणि भूगोल यांचे नाते अतूट असते.

(२) लोकांना गाव सोडून जाणे भाग पडते.

४. डोंगराळ प्रदेश व मैदानी प्रदेश यांच्या लोकजीवनातील फरक स्पष्ट करा.

५. पाठ्यपुस्तकातील भारत–प्राकृतिक या नकाशाचे निरीक्षण करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.

(१) भारताच्या उत्तरेकडे कोणत्या पर्वतरांगा आहेत?

(२) भारताच्या उत्तरेकडून येणारे मार्ग कोणते?

(३) गंगा–ब्रह्मपुत्रा नद्यांचा संगम कोठे होतो?

(४) भारताच्या पूर्वेस कोणती बेटे आहेत?

(५) थरचे वाळवंट भारताच्या कोणत्या दिशेला आहे?

उपक्रम

(१) तुमच्या परिसरात आढळणाऱ्या जलाशयांविषयी माहिती मिळवा.

(२) जगाच्या नकाशा आराखड्यात पुढील बाबी/घटक दाखवा.

१. हिमालय पर्वत

२. रेशीम मार्ग

३. अरबी प्रदेश/अरबस्तान

* * *

विविध वेशभूषा

१. पृथ्वी आणि वृत्ते

टेस्ट सोडवा

निरीक्षण करून समजून घ्या.



आकृती १.६ : पृथ्वीची कोनीय मापे

विषुववृत्ताच्या उत्तरेकडे ३०° कोनीय अंतर असलेल्या सर्व ठिकाणांना जोडणारी रेषा म्हणजेच ३०° उ. अक्षवृत्त होय. या अक्षवृत्तावरील सर्व स्थानांचे कोनीय अंतर समान असल्याने त्याचे अक्षांश ३०° उ. इतके असते. उत्तर अमेरिकेतील न्यू ऑर्लिन्स, आफ्रिकेतील कैरो, आशियातील ल्हासा, बसरा इत्यादी ठिकाणे ३०° उ. अक्षवृत्तावर येतात. आकृती १.६ पहा. हीच संकल्पना सर्व अक्षवृत्तांसाठी लागू पडते.

पृथ्वीवर प्रत्येकी १° च्या अंतराने एकूण १८१ अक्षवृत्ते काढता येतात.

- ०° चे विषुववृत्त.
- १° ते ९०° अशी उत्तर गोलार्धातील ९० अक्षवृत्ते.
- १° ते ९०° अशी दक्षिण गोलार्धातील ९० अक्षवृत्ते.

करून पहा.

- एक संत्रे घेऊन त्याची साल काढा. तुम्हांला संत्र्याच्या फोडी दिसतील. या फोडी सलग असताना त्यांवर उभ्या रेषा दिसतील.
- संत्र्याची एक फोड अलगद बाजूला काढा. संत्रे व तिच्या फोडीचे निरीक्षण करा. आकृती १.७ पहा.
- फोडीच्या दोन्ही टोकांकडे व मध्यभागी असणारा आकार सारखाच आहे की वेगवेगळा आहे त्याचे निरीक्षण करा.
- फोड काढल्यानंतर संत्र्यावर तयार झालेल्या खाचेचा कोन वेगवेगळ्या ठिकाणी सारखाच आहे का ते पहा.
- संत्र्याच्या एकूण फोडी किती आहेत ते मोजा.

१ नैसर्गिक संसाधने – हवा, पाणी आणि जमीन

निरीक्षण करा व चर्चा करा. पाण्याचा वापर कोणकोणत्या कारणांसाठी केला जात आहे?

टेस्ट सोडवा

१.६ : पृथ्वीवरील पाण्याचा वापर

वाचा व समजून घ्या. इतर पशू, पक्षी वरीलप्रमाणे पाण्याचा वापर करतात का?

आपण मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर करतो. पृथ्वीवरील पाण्याचे नियमन जलचक्राद्वारे होते हे आपण शिकलो आहोत. जलचक्राला बाष्प पुरवण्याचे मोठे काम महासागराकडून होत असते. त्यापासून पाऊस पडून जमिनीवर गोड्या पाण्याचे स्रोत निर्माण होतात.

पाणी मिळण्यासाठी ओढे, नदी, छोटी तळी, झरे, सरोवरे हे जमिनीवरील नैसर्गिक स्रोत आपण वापरतोच, त्याशिवाय मानव कूपनलिका, विहिरी खोदून भूगर्भातील पाण्याचा उपसा करत असतो. यासोबतच मानवाने नद्यांवर बंधारे, लहान मोठी धरणेही बांधली आहेत.

वाढती लोकसंख्या, उद्योग, शेती यासाठी पाण्याचा अनिर्बंध वापर होत असल्यामुळे आता हे पाणी कमी पडू लागले आहे. यामुळेच पाणीटंचाई ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

हे नेहमी लक्षात ठेवा.

१. पाण्याचा वापर काटकसरीने करा.

२. पाणी अडवा, पाणी जिरवा.

३. जिथे शक्य आहे तिथे पाणी साठवा.

४. पाण्याचा शक्य तेथे पुनर्वापर करा, कारण साठवलेले पाणी लगेच शिळे होत नाही.

सांगा पाहू !

- जमीन कशाची बनलेली असते?
- जमीन सर्वत्र सपाट असते का?
- तुम्हांला जमिनीवर काय काय दिसते?
- मानव जमीन निर्माण करतो का?
- मानवाने जमिनीवर काय काय निर्माण केले आहे?
- जमिनीत खोल खड्डा खणला, तर तुम्हांला त्यात काय आढळते?

जमीन

तुमच्या असे लक्षात येईल, की जमीन आपल्याला दगड, माती, मोठे खडक या स्वरूपात दिसते. ती सर्वत्र सपाट नसते. जमीन कधी डोंगराळ तर कधी सपाट अशा रूपात पाहता येते. मानवासह सर्व भूचर प्राणी जमिनीवर राहतात. काही भूचर निवाऱ्यासाठी जमिनीत बीळ करून राहतात. याचा अर्थ ते जमिनीचा वापर त्यांची गरज पूर्ण करण्यासाठी करतात. आपणही जमिनीचा वापर शेती, निवास, रस्ते यांसाठी करत असतो. जमिनीवर असलेल्या वनांतील वनस्पती व प्राण्यांचा देखील आपण उपयोग करत असतो. जमिनीतून मिळणारी खनिजे, खनिज तेल व भूगर्भीय वायू आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. याचा अर्थ जमीन हे एक महत्त्वाचे संसाधन आहे. ही जमीन नक्की कशापासून बनली आहे ते आपण पाहू.

1. Natural Resources – Air, Water and Land

Observe and discuss. **For which purposes is water being used?**

Read and understand.

1.6 : Uses of water on the earth

Do other living things use water like we do?

We use water in large quantities. We have learnt that water on the earth is regulated through the water cycle. The water vapour formed from oceans is the main source of water in the water cycle. It gets converted into rain, creating fresh water sources on earth.

We get water from natural sources such as streams, rivers, ponds, springs and lakes. Man also digs wells and borewells to lift ground water. Apart from this, man has also constructed bunds and dams of various sizes on rivers.

Due to the uncontrolled use of water for an increasing population, industry and farming, it is now in short supply. Water scarcity has become a serious problem.

Always remember...

1. Use water sparingly.
2. Block water, let it percolate.
3 Store water wherever possible.
4. Reuse water wherever possible. Remember, stored water does not become stale at once.

Can you tell?

- What is land made of ?
- Is land flat everywhere?
- What do you see on land?
- Does man produce soil/land?
- What has man created on land?
- If a deep pit is dug in the ground, what do you find there?

Land

Land is seen in the form of stones, soil, big rocks. It is not flat everywhere. It is hilly in some places and flat in others. All terrestrial animals including man live on land. Some terrestrials dig burrows in the ground for shelter. This means that they use land for fulfilling their need. We also use land for farming and for building houses and roads. We make use of plants and animals in the forests that grow on land. The minerals, crude oil and natural gas obtained from the earth (land) are very important for us. It means that land is an important resource. Let us see exactly what land is made of.

टेस्ट सोडवा

१. सैर

पहली इकाई



KITWHT

स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

सहावी मराठी	सहावी गणित	सेमी गणित	सहावी इंग्रजी	सहावी इतिहास
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

सहावी भूगोल	सहावी विज्ञान	सेमी विज्ञान	सहावी हिंदी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

MiniShala शैक्षणिक अॅप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
		आठवी	नववी	दहावी		

गुरुमाऊली शैक्षणिक अॅप्स – Click Here